शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२२२१७
ई मेल आय.डी.क्र dydpune@gmail.com वेब साईट क्रमांक www.dydepune.com

कालमर्यादीत

जा.क्र.उमाशि-२/शि.मा./पुवि/१४-१५/
दिनांक : ७/२/२०१५ 2842142

प्रति

प्राचार्य/प्राचार्या,
उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे / सोलापूर / अहमदनगर.

7 FEB 2015

विषय :- खाजगी मान्यताप्राप्त अनुदानीत उ. मा. वि. शाळांतील शिक्षकांच्या वाढीव पदांना मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :- १) शा.नि.क्रं.संकीर्ण-१०९९/(२५५/९९)/माशि-२/ दिनांक ६/९/१९९९
२) शा.नि.क्रं.एसएसएन-१००७/(३६५/०७)/माशि-२/ दिनांक ६/२/२०१२
३) शा.नि.क्रं.संकीर्ण-२०१२/(२०९/१२)/प्राशि-२/दिनांक ६/९/२०१२
४) मा. शिक्षण संचालनालयाकडील क्रं. एचएससी/१५२०११/३१५५४/१२एचएस /३०४८ दिनांक २५/३/२०१२
५) शा.नि.क्रं.एसएसएन-१००८/(२००/०८)/माशि-२/दिनांक २३/१०/२०१३
६) शा.नि.क्रं.एसएसएन-२०१४/(१/१४)/टिएनटी-२/ दिनांक २०/६/२०१४
७) शा.नि.क्रं.एसएसएन-२०१४/(१/१४)/टिएनटी-२/ दिनांक १९/७/२०१४
८) मा. शिक्षण संचालनालयाकडील पत्र क्रं. उच्च माध्य-२४३/वैय. मान्यता/५९२ दिनांक ७/२/२०१५

शासन निर्णय दिनांक ६/२/२०१२ अन्वये दिनांक २ मे २०१२ नंतर भरतीस प्रक्रियेस असलेली बंदी शासन निर्णय क्रं. दिनांक २०/६/२०१४ अन्वये उठविण्यात आलेली आहे. दिनांक ३/१२/२०१४ रोजी झालेल्या पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना यांचे समवेत झालेल्या सहविचार सभेतील ठराव क्रमांक ५ नुसार मे २०१२ पूर्वीच्या या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन विहित कार्यपध्दतीने नियुक्त केलेल्या शिक्षकांना तसेच २ मे २०१२ नंतर नियुक्त शिक्षकांच्या मान्यतासाठी काही संस्थांना शासनाने दिलेल्या परवानगीनुसार माहे डिसेंबर २०१३ मध्ये शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी कर्मचारी मान्यता नस्ती मध्ये शाळा / संस्था यांचेकडून त्रूटींची पूर्तता झालेली असल्यास असे प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत शिबीर आयोजित करण्यात येत आहे.

तसेच शासन निर्णय दिनांक २१/५/२०१४ अन्वये राज्यातील खाजगी मान्यता प्राप्त अनुदानीत उच्च माध्यमिक शाळांतील सन २००३-०४ ते २०१०-११ या वर्षातील वाढीव शिक्षकांच्या ९२६ पदांना मान्यता देण्यात आली आहे. त्यातील पुणे विभागातील सन २००७-०८ ते २०१०-११ या वर्षातील २०७ वाढीव पदांना मान्यता मिळालेली आहे. सदर वाढीव पदांना मान्यताबाबतची आदेश पत्रे सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना दिनांक ११/८/२०१४ रोजी पाठविण्यात आलेली आहेत. सदर वाढीव पदावरील नियुक्त्यांना वैयक्तिक मान्यतेवरील निर्णय होण्यासाठी **माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये दिनांक १६/२/२०१५ ते २४/२/२०१५ या कालावधीत पूना कॉलेज, मोदीखाना पुणे-१ येथे शिबीर आयोजित करण्यात येत आहे.**

संस्था प्रमुख व प्राचार्य यांचे प्रस्ताव सदर शिबिरात सादर करण्याबाबतचे मुद्दे खालीलप्रमाणे

१. पुर्णवेळ, अर्धवेळ, प्रतिघडयाळी तास तत्वावरील नियुक्त केलेल्या शिक्षकांचा नियमानुसर नियुक्त केलेल्या मान्यतेचा प्रस्ताव आपणास नेमून दिलेल्या तारखेस दुपारी १२.०० पूर्वी शिबिरात सादर करणे आवश्यक आहे. नस्तीला पेजींग करुन तसे प्राचार्यांनी प्रमाणीत करणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

२. या पूर्वीच्या शिक्षक मान्यता शिबीरात प्राप्त झालेल्या प्रस्तावातील आक्षेप संबंधित कनिष्ठ महाविद्यालये/ उच्च माध्यमिक विद्यालयांना कळविलेले आहेत सदर आक्षेपांची पूर्तता होत असेल तरच या शिबिरात प्रस्ताव सादर करावा. अपूर्ण प्रस्ताव सादर होणार नाही याची दक्षता संस्था प्रमुख/प्राचार्यांनी घ्यावी. नस्ती सादर करतेवेळी नस्तीला पेजींग करुन तसे प्राचार्यांनी प्रमाणीत करावे.

३. शिबीराच्या वेळापत्रकप्रमाणेच परिपूर्ण प्रस्ताव शिबिरात दाखल करुन निर्णय प्राप्त करुन घ्यावेत. शेवटच्या दिवशी अनावश्यक गर्दी करणे टाळण्यात यावी.

४. प्रस्ताव जाणकार लिपीकाबरोबरच शिबिरात सादर करावा. प्राचार्यांनी शिबीरात उपस्थित राहणे आवश्यक आहे. संबंधित शिक्षक किंवा अन्य कर्मचारी यांना शिबीरासाठी पाठवू नये याची नोंद घ्यावी.

५. शिबरात नियुक्त शिक्षकासोबत मान्यतेचा प्रस्ताव दाखल केल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल.

६. या शैक्षणिक वर्षातील हे शेवटचे शिक्षक मान्यता शिबीर असल्याने शिबीराचा कालावधी संपल्यानंतर दिनांक २४/१/२०१५ नंतर प्रस्ताव कार्यालयात दाखल करुन नयेत. त्याची दखल घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी

७. शिक्षण उपसंचालक यांना अचानक उद्भवलेल्या अन्य महत्वाच्या कामामुळे शिबीरात उपस्थित राहाता आले नाही तर सदर दिवशी दाखल झालेल्या प्रस्तावावर निर्णय कोणत्या तारखेस मिळेल याची माहिती शिबिरात दिली जाईल.

वरील बाबींचे काटेकोर पणे पालन करुन परिपूर्ण प्रस्ताव शिबिरात दाखल करणे व मान्यता प्राप्त करुन घेणे याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील.

शिबीराचे वेळापत्रक

वेळ :- सकाळी १० ते दुपारी १.०० दुपारी २.३० ते ५.४५

| अ. क्र. | दिनांक | जिल्हा | स्थळ |
|---|---|---|---|
| १. | १६/२/२०१५ | सोलापूर | पुना कॉलेज न्यू मोदी खाना पुणे |
| २. | १८/२/२०१५ | सोलापूर | |
| ३ | २०/२/२०१५ | अहमदनगर | |
| ४. | २१/२/२०१५ | अहमदनगर | |
| ५. | २३/२/२०१५ | पुणे | |
| ६. | २४/२/२०१५ | पुणे | |

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(राजेंद्र गोधने)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

प्रत-

१. मा. शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक )
शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर
/- यांनी शिबीराचे वेळापत्रक व ठळक मुद्दे या बाबींना आपल्या जिल्हयांच्या स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

३. प्राचार्य ; पुना कॉलेज मोदीखाना पुणे-१
/- यांनी शिक्षक मान्यता शिबीराच्या वेळी आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.

Scanned by CamScanner